703

# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)
मुख्य कार्यालय : चौथा मजला, काकडे बीझ आयकॉन,
ई-स्क्वेअर जवळ, पुणे विद्यापीठ रोड, अशोक नगर,
शिवाजी नगर, पुणे - ४११०१६.
दूरध्वनी क्रमांक : (का.) : ०२०-२५५७७९९९, २५५७७९००
ई-मेल : srapune@yahoo.in वेबसाईट : www.srapune.gov.in

झो.पु.प्रा निश्चयेन परिवर्तनम्। झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण पुणे व पिंपरी चिंचवड

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. झोपुप्रा/तां-२/अंभोप्र/मा.क्र.१५९/८९३ /२०२४
दि. १५ /०३/२०२४.

## अंशत: भोगवटा प्रमाणपत्र (पुनर्वसन घटकाकरिता)

वाचा - १) मूळ बांधकाम मंजूरी क्र. ६८० दि. १८/०५/२०१७.

२) सुधारित बांधकाम मंजूरी क्र. ९५६ दि.३०/०६/२०२१.

३) योजनेचे विकसक यांचा दि.२६/०२/२०२४ रोजीचा प्रस्ताव.

४) वास्तुविशारद यांचे दि.२६/०२/२०२४ रोजीचे बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र.

५) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मान्यता दि.१५/०३/२०२४.

Slum Rehabilitation Authority Technical Department APPROVED Pune-Pimpri-Chinchwad Area

---

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ कलम ४५ प्रमाणे मौजे बोपोडी,पुणे सि.स.नं.२५९३ ते २६११ येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील इमारतीस या प्राधिकरणामार्फत दि.३०/०६/२०२१ रोजी सुधारित बांधकाम परवानगी देणेत आली आहे. मंजूर बांधकाम परवानगी प्रमाणे इमारतीमधील पुनर्वसन घटकाचे बांधकाम पूर्ण झाल्याने योजनेचे विकसकांनी उपरोक्त वाचा मध्ये नमूद केले नुसार प्रस्ताव प्राप्त आहे.योजनेच्या वास्तुविशारदांनी पुनर्वसन घटकाचे बांधकाम पूर्ण झाल्याचे प्रमाणित केले असल्याने झोपु योजनेच्या इमारतीमधील पूर्ण झालेल्या मजल्यांना पार्कीगसह मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडील मान्यतेनुसार अंशत: भोगवटा प्रमाणपत्र देणेत येत आहे.

(पुनर्वसन + विक्री) घटकापैकी पुनर्वसन घटक सदनिकांकरिता

| अ.क्र. | मजले | मंजूर बांधकाम नकाशानुसार | | एकूण सदनिका / दुकाने |
|---|---|---|---|---|
| | | पुनर्वसन घटक | | |
| | | Resi. | Comm. | |
| १) | लोअर ग्राऊंड फ़्लोअर | पार्किंग | दुकान क्र.०१,०२,०३,०५,०६ | ०५ दुकाने + १ सोसायटी ऑफिस + टॉयलेट |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २) | दुसरा | सदनिका क्र. २०५ ते २०७ | -- | ०३ सदनिका |
| ३) | तिसरा | सदनिका क्र. ३०१ ते ३०७ | -- | ०७ सदनिका |
| ४) | चौथा | सदनिका क्र. ४०१ ते ४०७ | -- | ०७ सदनिका |
| ५) | पाचवा | सदनिका क्र. ५०१ ते ५०७ | -- | ०७ सदनिका |
| ६) | सहावा | सदनिका क्र. ६०१ ते ६०७ | -- | ०७ सदनिका |
| एकूण | | ३१ सदनिका | ०५ दुकाने | ३१ सदनिका + ०५ दुकाने |

Slum Rehabilitation Authority Technical Department APPROVED Pune-Pimpri-Chinchwad Area

**पुनर्वसन घटक सदनिका :-**

निवासी सदनिका :-३१ सदनिका

बिगर निवासी सदनिका :-०५ दुकान गाळे

**एकूण :- ३१ सदनिका +०५ दुकान गाळे +१ सोसायटी ऑफिस+टॉयलेट पार्किंगसह**

प्रस्तुत प्रकरणी आर्कीटेक्ट यांनी दिलेले बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र व विकसक यांनी दिलेले ना हरकत प्रमाणपत्र, प्रतिज्ञापत्र विचारात घेता ,खाली नमूद अटी व शर्तीस अधीन राहून अंशत: भोगवटा प्रमाणपत्र देणेत येत आहे.

**अटी व शर्ती :-**

१) प्रस्तुत अंशत: भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेनंतर सदर इमारतीमध्ये वा भूखंडामध्ये वाढीव बांधकाम केल्याचे आढळून आल्यास सदर बांधकाम अनाधिकृत समजण्यात येईल आणि त्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६चे कलम ५२ ते ५६ नुसार कारवाई करण्यात येईल.

२) प्रकरणी भविष्यात कोणतीही शासकीय देणी / येणे देय असल्याबाबत आढळून आल्यास अगर विविध देय शुल्कांच्या परिगणनेमध्ये तफावत आढळून आल्यास त्याप्रमाणे फरकाची रक्कम भरणे विकसकावर बंधनकारक राहील.

३) स्थानिक संस्था कराबाबत व उपकराबाबत शासन धोरण व नियमानुसार आवश्यक ती पूर्तता करणे व सर्व अटी / शर्तीचे पालन करणे विकसकांवर बंधनकारक राहील.

४) इमारतीचे सर्व बाजूंनी असणारे सामासिक अंतराचे क्षेत्र (All Marginal open space) कायम खुले ठेवणे बंधनकारक आहे.

५) प्रकल्पाअंतर्गत योजना क्षेत्रातील सार्वजनिक रस्त्याअंतर्गत क्षेत्र सर्व रहिवाशांच्या सार्वजनिक वापराकरिता निरंतर उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.

६) विषयांकित मिळकतीमधील रस्तारूंदीकरणाखालील क्षेत्र संबंधित पुणे महानगरपालिकेस हस्तांतरीत करून तसे, अंतिम भोगवटा मागणीपूर्वी, या कार्यालयास अवगत करावे.

७) इमारतीमधील प्रस्तावित ३६ पुनर्वसन सदनिका वाटपाबाबत निर्णय होईपर्यंत इमारतीमधील पुर्ण झालेल्या सदनिकांच्या सुरक्षेची जबाबदारी विकसकावर राहील.

८) इमारतीसभोवती च्या सामसिक अंतरातील सार्वजनिक शौचालय,झोपडी अंतिम भोगवटा प्रमाणपत्र मागणीपुर्वी काढणे बंधनकारक राहील,त्या शिवाय इमारतीकरिता अंतिम भोगवटा दिला जाणार नाही.

९) अंशत: भोगवटा प्रमाणपत्रासाठी अर्जासोबत सादर केलेली कागदपत्रे चुकीची खोटी अथवा दिशाभूल करणारी असल्याचे भविष्यात आढळून आल्यास दिलेले भोगवटा प्रमाणपत्र आपोआप रद्द समजण्यात येईल.

सोबत - नकाशे

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने }

प्रभारी सहायक संचालक नगररचना
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र पुणे.

प्रत :- १) विकसक मे. नाकोडा अलका डेव्हलपर्स,२५६ बी ३ रा मजला ,अल्का प्लाझा,भवानी पेठ,पुणे-४२.

२) आर्कि. प्राईड डिझायनर, १ synagouge street, lal deval society, Unit No. B१०, camp, Pune - ४११००१.

३) तहसिलदार,ताबा विभाग, झोपुप्रा, पुणे, यांना माहितीस्तव.

Slum Rehabilitation Authority Technical Department APPROVED Pune-Pimpri-Chinchwad Area